पुढारी

बुधवार, ७ फेब्रुवारी २०२४

# शहाना रेवणकरची आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**कोल्हापूर** : कन्याकुमारी येथे झालेल्या राष्ट्रीय प्लोअर स्पर्धेमध्ये विवेकानंद कॉलेजची शहाना सुरेश रेवणकर (बी.सी.एस.भाग-२) हिची महाराष्ट्र संघातून निवड झाली होती. स्पर्धेमध्ये महाराष्ट्र संघातून शहानाला सुवर्णपदक मिळाले. स्पर्धेमधून तिची फिनलँड (युरोप) येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी भारतीय संघामध्ये निवड झाली आहे. यशाबद्दल तिचे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी अभिनंदन केले. खेळाडूस ज्युनिअर जिमखाना विभाग प्रमुख प्रा. सहिदा कच्छी, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. पल्लवी देसाई, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.